# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ११/०७/२०२४ (गुरूवार) सकाळ**

## पोस्टे काटोल अंतर्गत आगामी सण– उत्सव  मोहरम व आषाढी एकादशी सबंधाने शांतता समिती बैठक

दि. ११/०७/२०२४ रोजी १७.०० वा. ते १८.०० वा. दरम्यान मा. पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामिण श्री. हर्ष पोद्दार, यांच्या अध्यक्षेतेखाली आगामी येणाऱ्या मोहरम व आषाढी एकादशी निमित्याने पोलीस ठाणे काटोल हद्दीतील सर्व धर्मीय लोक, पोलीस पाटील व पत्रकार यांची एकत्रितरित्या सन उत्सव दरम्यान शांतता राखण्याबाबत पोलीस ठाणे काटोल च्या सभागृहामध्ये बैठक घेण्यात आली. बैठकीमध्ये मा. पोलीस अधिक्षक यांनी लोकांच्या अडीअडचणी जाणुन घेवुन सन उत्सवादरम्यान शांतता राखण्याबाबत समज दिली. तसेच काटोल शहराचा इतिहास पाहता आजपावेतो येथे धार्मिक तणाव निर्माण झालेले नाही. कोणीही धार्मिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करणार नाही. अशी समज दिली तसेच गुन्हेगार हे एकाच समाजाचे नसतात ते कोणत्याही समाजाचे असु शकतात. त्यामूळे कोणत्याही समाजाला टार्गेट करणे चुकीचे आहे. काटोल शहरामध्ये अवैध धंदे कोणीही करणार नाही असे सांगितले. सदर बैठकी करीता मा. उपविभागीय अधिकारी काटोल श्री. पडोळे, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल विभाग काटोल श्री. बापू रोहेम, पोलीस निरीक्षक काटोल मेश्राम व ८० ते ९० लोकं उपस्थितीत होते.











पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर